REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हांशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख १६ ऑक्टोबर, १९४० | अंक ४२

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

**दुसरी आवृत्ति**

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—( १ ) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# विविध माहिती

### रुमानियांत जर्मन सैन्याचा प्रवेश

जर्मनीनें आपली थोडी फौज रुमानियांत पाठवली आहे. तेथील राकेल तेलाच्या खाणींच्या संरक्षणासाठी ही तजवीज करण्यांत आली असल्याची सबब जर्मनीनें पुढें केली आहे. आपल्या युद्ध हेतूच्या सिध्यर्थ रुमानियाचा उपयोग करण्याचा हा जर्मनीचा डाव आहे.

### इटालियन लष्करी अधिकारी रुमानियांत गेले

रुमानियाच्या लढाऊ तयारीस सहाय्य करण्यासाठीं आपले कांहीं लष्करी अधिकारी आपण त्या देशांत पाठवले आहेत असें इटली सांगत आहे.

### ग्रेट-ब्रिटनला अमेरिकेचें सहाय

प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं अमेरिका इंग्लंडला भरपूर युद्धसहाय देईल अशा अर्थाची घोषणा नुकतीच केली आहे. स्वातंत्र्य आणि लोकशाही ह्यांचें रक्षण करणाऱ्या ग्रेट-ब्रिटनला त्या राष्ट्रांच्या शत्रूविरुद्ध सहाय करणें अमेरिकेचें कर्तव्य आहे असें ते म्हणाले.

### "समुद्रास्तुभ्यंदु"—कॉफी समुद्रांत फेकली!

कॉफीच्या उत्पादनाचे मानानें तिचा खप होत नसल्यानें तिची किंमत उतरूं नये म्हणून तिच्या लाखो पोत्यांचा समुद्रांत नाश करण्यांत येत आहे. गेल्या नऊ वर्षांत ब्राझिल देशांत सात कोटी कॉफीच्या पोत्यांचा नाश ह्याप्रमाणें झाला आहे. युरोपचे बाजार बंद झाल्याकारणानें ब्राझिलचें सरकार सात कोटि रुपये किंमतीची कॉफी खरेदी करणार आहे आणि तिच्यापैकीं निम्मी समुद्रांत फेकून देण्यांत येईल.

### तागाचें पीक मर्यादित होणार

तागाचे भाव उतरले असल्यानें त्याची लागवड मर्यादित करण्याचें बंगाल प्रांताच्या सरकारनें ठरविलें आहे. चालू सालीं तागाखालीं जितकें क्षेत्रफळ होतें त्याच्या एक-तृतियांश इतक्या जमिनींतच त्याची लागवड व्हावी अशी तरतूद व्हावयाची आहे. लागवडीबद्दल सरकारी परवाने घ्यावे लागतील आणि त्यांत क्षेत्रफळ नमूद करण्यांत येईल.

### काश्मीर संस्थानांत कोळशाच्या खाणी

काश्मीर संस्थानांत जम्मूमध्यें बगढी कोळसा निघण्याचा संभव स्पष्ट दिसूं लागला आहे.

### चित्रपट नटाची एक कोटि रुपयांची मालमत्ता

प. वा. डग्लस फेअर बँक्स ह्या जगविख्यात चित्रपट नटाची मालमत्ता सुमारें एक कोटि रुपये किंमतीची भरली आहे. तिच्यांतला मोठा भाग त्यानें आपली पत्नी व पुत्र (डग्लस फेअर बँक्स) ह्यांस मृत्युपत्रानें देऊन टाकला आहे.

### ब्रिटिश विमानांचें जर्मनीवर उड्डाण

ब्रिटिश लढाऊ विमानांनीं जर्मनीच्या मुलखावर केलेल्या उड्डाणांची संख्या आतां एक हजारावर गेलेली आहे. एक महिन्यामागें ही संख्या सातशें होती.

### तुर्कस्तानशीं हिंदी व्यापार वाढणार

हिंदी मालाची तुर्कस्तानमधील निर्गत वाढण्याचा संभव त्या देशाशीं होणाऱ्या नवीन व्यापारी करारामुळें दिसत आहे. ताग, लोखंड, पोलाद, कातडीं व चहा ह्या मालास तुर्कस्तानांत चांगली मागणी आहे.

### जखमा बऱ्या करण्याची नवी पद्धत

जखमी माणसाची जखम उघडून ती धुण्याची जुनी पद्धत अत्यंत दुःखदायक आहे. तिचेऐवजी एक नवीन पद्धत इस्पितळांतून उपयोगांत आणण्यांत येऊं लागली आहे. जखमी माणसास अँटी टिटॅनस व अँटी गँगरीन इंजेक्शनें दिल्यावर, थोडें मीठ टाकलेल्या गरम पाण्याच्या फवाऱ्यानें जखम धुवून, फाटलेलें मांस काढून जखम शिवून टाकली असतां व ती बांधून तिचेवर प्लॅस्टर लावलें असतां जखमी माणसास त्रास कमी होतो. जखम पूर्णपणें बरी झाल्यावर प्लॅस्टर काढण्यांत येतें. ह्या नव्या पद्धतीचा प्रयोग मुंबई येथील जे. जे. इस्पितळांत चालू आहे.

### येरवडा इंडस्ट्रिअल स्कूल

येरवडा येथील इंडस्ट्रिअल स्कूलमध्यें १९३९-४० अखेर २४१ मुलें होतीं, त्यांपैकीं १७१ हिंदु, ५८ मुसलमान व १० ख्रिस्ती होती. प्रत्येक विद्यार्थ्यामागें खर्च १७१ रुपये आला.

### स्त्रियांच्या कलाकौशल्याचें प्रदर्शन

पुणें येथील जिजामाता बागेंतील स्त्रियांच्या मोफत वाचनालयातर्फे स्त्रियांच्या कलाकौशल्याचें प्रदर्शन ता. २७ ते ३१ ऑक्टोबर अखेर दिवाळींत भरणार आहे. प्रदर्शनांत स्त्रियांनीं केलेल्या कलायुक्त वस्तू ठेवल्या जाणार आहेत व उत्कृष्ट वस्तूंस बक्षिसें मिळणार आहेत. सौ. शांताबाई नाशिककर प्रदर्शनाच्या मुख्य व्यवस्थापक आहेत.

### मुंबई प्रांतिक बँकेची उपशाखा

लासलगांव येथें मुंबई प्रांतिक सहकारी बँकेची उपशाखा सुरू करण्यांत यावयाची आहे, तिचें उद्घाटन ता. १७ ऑक्टोबर रोजीं बँकेचे चेअरमन, श्री. आर. जी. सरय्या, ह्यांचे हस्तें होणार आहे. ह्या उपशाखामुळें लासलगांवच्या आजूबाजूच्या सोसायट्यांच्या पैशाच्या व्यवहाराची सोय होणार असून हुंड्यांची विक्री व वसुली, रेल्वे रसिदींचीं कामें, ड्राफ्ट व हुंड्या देणें, शेतीच्या मालाचे तारणावर सभासदांस कर्जें देणें, इत्यादि कामेंहि उपशाखेंत होतील.

### इकडील गिरण्यांस सुताची ऑर्डर

लष्करी सामुग्रीस उपयोगी पडणाऱ्या विशिष्ट जातीच्या कापसाच्या सुताची सुमारें साडेतीन लाख रुपये किंमतीची ऑर्डर ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानांत दिली असून ती मुंबई, सोलापूर, मदुरा व कोइमतूर येथील गिरण्यांमध्यें वांटण्यांत आली आहे.

### ब्रह्मदेश-चीन रस्ता चालू होणार

ब्रह्मदेश आणि चीन ह्यांचे मधला व्यापारी रस्ता जपानचे सांगण्यावरून तीन महिने ब्रिटिश सरकारनें बंद ठेवला होता तो पुन्हां चालू करण्याचें ठरलें आहे.

### अर्जेंटाइनमध्यें सोळा कोटि डॉलर्सची खरेदी

अर्जेंटाइनमध्यें सोळा कोटि डॉलर्स किंमतीची अन्नसामुग्री खरेदी करण्याचा करार ग्रेटब्रिटननें केला आहे. एक वर्षाच्या मुदतींत हा माल पुरवावयाचा आहे. त्याची निम्मी किंमत रोखीनें दिली जाईल आणि निम्म्या किंमतीचे अर्जेंटाइन रोखे देण्यांत येतील.

### हिंदी रेल्वेजचें वाढतें उत्पन्न

१ एप्रिल ते ३० सप्टेंबर ह्या मुदतींत हिंदी रेल्वेजना ५१ कोटि रुपये उत्पन्न झालें. पूर्वीच्या वर्षांतील ह्याच मुदतींतल्या उत्पन्नापेक्षा हा आकडा ५ कोटि, २९ लक्ष रुपयांनीं अधिक आहे.

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४९४ |
| २ उद्योगधंद्यांची वाढ ... | ४९५ |
| ३ हिंदी रेल्वेजवरील फुकटे उतारू ... ... | ४९६ |
| ४ म्हैसूर शुगर कंपनी ... | ४९६ |
| ५ स्फुट विचार ... | ४९७ |
| राणी छापाचे रुपये—जर्मनीचे अंकित देश आणि त्यांचा अमेरिकेंत पैसा—युएसच्या कालव्यामधून जहाजांची वहातूक—जर्मनीची रुमानियांतील कारवाई—निर्गत व्यापारांत घट—अनुकूल व्यापारी आढाव्याचें महत्त्व | |
| ६ जपानी सायकली ... | ४९९ |
| ७ दि आयुर्वेद रसशाळा पुणें, लिमिटेड ... ... | ५०० |
| ८ हिंदी रेल्वेजचा वक्रशीरपणा ... | ५०० |
| ९ मुंबई प्रांतांतील शिक्षण-प्रगति ... ... | ५०१ |
| १० सहकारी संस्थांचे अहवाल | ५०२ |
| ११ निवडक बाजारभाव | ५०३ |

# अर्थ

बुधवार, ता. १६ ऑक्टोबर, १९४०

## उद्योगधंद्यांची वाढ

### सरकारचें आश्वासन

युद्ध सुरू झाल्यापासून अनेक जिनसांची परदेशांतून होणारी आयात मर्यादित झालेली आहे. त्या मानानें अनेक सामान्य व युद्धोपयोगी जिनसांस मागणी मात्र वाढती आहे. ह्या अनुकूल परिस्थितीचा फायदा घेऊन अनेक नवीन उद्योगधंदे देशांत निघत आहेत. सरकारच्या युद्धविषयक धोरणास ह्या धंद्यांची वाढ अनुकूल, किंबहुना आवश्यक, असल्यानें त्यांस आज अनेक मार्गांनीं सरकार उत्तेजन देत आहे. ही वाढ देशाच्या तात्कालिक व अंतिम हिताची असल्यानें सर्व भांडवलवाले व धंदेवाले लोकांनीं तिचा उत्साहानें पुरस्कार करणें योग्य आहे.

पूर्वीच्या अनुभवावरून असें दिसतें कीं सरकारी धोरण ह्या बाबतींत 'गरज सरो नी वैद्य मरो' अशा स्वरूपाचें असतें. मोठमोठे धंदे स्थापन करण्यास बुडीत भांडवल फार मोठ्या प्रमाणांत गुंतवावें लागतें. दीर्घकालपर्यंत किफायतशीर भावानें मालाचा उठाव होण्याची खात्री नसेल तर असे मोठे धंदे स्थापन होणार नाहींत व स्थापन झाले तरी त्यांची पूर्ण वाढ होऊन उत्पादन खर्च कमींत कमी होणार नाहीं. सरकारचें युद्धकालचेंच संरक्षक धोरण चिरकाल टिकल्याशिवाय धंद्यांची पूर्णपणें वाढ होणार नाहीं.

सरकारचें प्रकट औद्योगिक धोरण विवेकपूर्ण संरक्षणाचें आहे. धंद्या-धंद्यांत निवड करून जे धंदे सरतेशेवटीं आपल्या पायांवर उभे राहण्यास समर्थ होतील अशी खात्री वाटेल त्यांस जरूर तितकें व आवश्यक तितक्या काळपर्यंत संरक्षण द्यावें हें विवेकप्रधान धोरण वरवर पहाणारास निरपवाद वाटतें. परंतु आर्थिक क्षेत्रांत निवळ विवेकास पुरेसें साधन नेहमींच लाभतें असें नाहीं. आपल्या धंद्यांच्या सद्यःस्थितीबद्दल फार तर तपशीलवार माहिती मिळूं शकते. परंतु ज्या इतर राष्ट्रांतील धंदेवाल्यांशीं हिंदी उत्पादकांस टक्कर द्यावयाची असते त्यांच्या परिस्थितीची पूर्ण माहिती मिळूं शकत नाहीं. संरक्षण हें कांहीं ठराविक कालपर्यंत द्यावयाचें असतें, त्यामुळें संरक्षण देतांना थोडीबहुत भविष्यकालीन परिस्थिति ध्यानांत घ्यावी लागते. जिनसांचे भाव, जकाती, हुंडणावळ, आंतरराष्ट्रीय परिस्थिति, अशा अनेक बाबी आहेत कीं ज्यांचें निश्चित भविष्य वर्तविणें कोणाहि तज्ञास शक्य नसतें.

कोणत्याहि धंद्यास संरक्षण बहाल करण्यापूर्वी त्याची पूर्ण चौकशी व्हावी हें तत्त्व निर्विवाद आहे. परंतु चौकशीचा निर्णय ठरवितांना दिवाणी अगर फौजदारी कायद्याचा कांटेकोरपणा ठेवून चालत नाहीं. एकंदर धोरण संरक्षणाचें ठेवून एखाद्या धंद्याचें राष्ट्रास महत्त्व नाहीं अगर त्याचा शेवटीं टिकाव लागणें अशक्य आहे असें निश्चितपणें ठरल्याखेरीज त्याचा संरक्षणाचा हक्क काढून घेऊं नये. बऱ्यावाईट सर्व धंद्यांस संरक्षण मिळून वाढत्या किंमतींच्या व करांच्या रूपानें समाजावर निष्कारण बोजा पडूं नये याकरितां प्राथमिक चौकशी व सरकारी नियमन ह्या दोहोंचीही जरूरी आहे. परंतु संरक्षणांत विवेकाबरोबरच सहानुभूतीचा भाग असला पाहिजे. कांचेच्या धंद्यास हिंदुस्थान सरकारनें संरक्षण देण्याचें नाकारलें, त्यावरून सरकारी धोरण किती सहानुभूतीशून्य आहे तें कळून आलेलेंच आहे.

ह्या बाबतींत बरीच सुधारणा घडून आल्याखेरीज हिंदी धंदेवाले निर्धास्तपणें व उत्साहानें नव्या धंद्यांत पडणार नाहींत. हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री सर रामस्वामी मुदलियार हे नुकतेच कलकत्ता येथें गेले असतां तेथील हिंदी व्यापारी मंडळींनीं हे सर्व मुद्दे त्यांच्या समोर मांडले. व्यापारमंत्र्यांनीं आपल्या उत्तराच्या भाषणांत सरकारी धोरणांत ह्यापुढें सहानुभूतीचें प्रमाण वाढलेलें दिसेल असें आश्वासन दिलें. हिंदी व्यापारमंत्र्यांचें आश्वासन केव्हांहि स्वागतार्हच आहे व त्याचा धंदेवाईक मंडळीकडून योग्य तो सत्कार होईलच. परंतु आर्थिक धोरणाबद्दलची सरकारची आजपर्यंतची धरसोड पाहिली म्हणजे सरकारचें धोरण अधिक स्पष्टपणें जनतेपुढें येणें जरूर वाटतें. निदान सध्याच्या राज्यपद्धतींत तरी स्वतः व्हाइसरॉयसाहेब किंवा अर्थमंत्री ह्यांचेकडून नव्या आर्थिक धोरणाची घोषणा होणें इष्ट आहे.

सर रामस्वामी मुदलियार ह्यांनीं दिलेल्या आश्वासनांतील दोन-तीन भाग विशेष महत्त्वाचे आहेत. युद्धकार्यास जरूर असणाऱ्या कोणत्याहि जिनसेचा कारखाना निघावयाचा असल्यास त्याची सरकारास माहिती द्यावी म्हणजे सरकार स्वतः त्या धंद्याची चौकशी करून तो एकंदरीनें कार्यक्षम व भरींव आहे असें कळतांच त्यास योग्य तें साहाय्य देईल. ह्या चौकशीस पूर्वीइतका वेळ लागणार नाहीं, कारण ती जकातमंडळामार्फत न होतां सरकारच्या व्यापारी खात्यामार्फतच होणार आहे. चौकशीच्या ह्या नव्या प्रकारानें दिरंगाई टळेल हें खरें. परंतु त्या उलट व्यापाराची शेंडी निःपक्षपाती व तज्ञ न्यायमंडळाचे हातून कोणासही जबाबदार नसलेल्या सरकारी अधिकाऱ्यांच्या हातांत जाईल व ही प्रथा अनिष्ट समजली पाहिजे. सरकारनें प्राथमिक चौकशीस फार वेळ न घेतां धंदेवाल्यांचे अर्ज लौकर जकातमंडळापुढें अगर त्यासारख्याच एखाद्या आर्थिक सल्लागार मंडळापुढें आणावें असें ठरविणें अधिक इष्ट होय. मंडळानेंहि युद्धपरिस्थिति ध्यानांत घेऊन दिरंगाई न लावतां तात्काळ आपला सल्ला सरकारास द्यावा अशी व्यवस्था करतां येईल. सरकारी खात्यापेक्षां मंडळामार्फतच आर्थिक धोरणाचा अंमल होणें अधिक श्रेयस्कर आहे.

युद्ध संपल्यानंतर, नव्या स्थापन झालेल्या धंद्यांकडे दुर्लक्ष्य होणार नाहीं व त्यांस कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत आवश्यक

तेवढी मदत मिळत राहील हें सर रामस्वामींचें आश्वासन निःसंशय स्वागतार्ह आहे. परंतु सरकारी मदतीची अपेक्षा करणाऱ्या धंद्यानें पहिल्या प्रथम आपली लायकी सरकारपुढें सिद्ध केली पाहिजे ही अट असल्यानें पुन्हां अनर्थपरंपरा कोसळण्याचा संभव आहे. विलायतेंतील धंदेवाल्यांनींच आपल्या शाखा अगर पोटमंडळ्या इकडे काढाव्या व त्यांची लायकी अगर कार्यक्षमता सरकारास अधिक पटून स्वदेशी धंद्यास जाचणूक व्हावी अशी परिस्थिति निर्माण होणें अशक्य नाहीं. आर्थिक धोरणाचा अंमल करण्याचें काम स्वतंत्र मंडळाकडे सोंपवून राष्ट्रीय हिताच्या प्रत्येक अर्जाचा निकाल होणें जरूर आहे. युद्धकालीन विशेष परिस्थितीमुळें साम्राज्याच्या इतर भागांतील धंदेवाल्यांचा थोड्या प्रमाणांत येथें शिरकाव होणें अपरिहार्य ठरलें तर अशा धंद्यांवर कोणकोणतीं नियंत्रणें घालणें जरूर आहे हेंहि ठरविलें पाहिजे.

हिंदुस्थानांत कोणत्या तऱ्हेचे परकी धंदेवाले येऊन घरें करीत आहेत इकडे लक्ष न दिल्यानें आजवर संरक्षणाचाच काय परंतु स्वदेशी चळवळीचाहि पुष्कळसा फायदा परकीयांनींच उपभोगिला आहे. युद्धपरिस्थितीमुळें परकी धंदेवाल्यांचा पाय येथें अधिक खोल रुतण्यास मदत व्हावयाची नसेल तर सरकारनें वेळींच योग्य उपाययोजना करणें जरूर आहे.

---

## हिंदी रेल्वेजवरील फुकटे उतारू

हिंदी रेल्वेजवर विगर तिकीट प्रवास करणारांची संख्या फार मोठी आहे. आगगाड्यांतून व रेल्वे स्टेशनांतून बाहेर घालवून दिल्या जाणाऱ्या असंख्य भिकाऱ्यांचा समावेश केला नाहीं, तरी १९३८–३९ मध्यें एकूण २४½ लाखांपेक्षा अधिक उतारू विगर तिकिटाचे अगर चुकीच्या तिकिटाचे आढळले. कित्येक लोकांच्या टोळ्याच्या टोळ्या विगरतिकिट प्रवास करतात, त्यांस बाहेर काढणें अतिशय कठीण जातें. कांहीं महत्त्वाच्या रेल्वेजवर विन-तिकिटाचे उतारू गेल्या वर्षी किती आढळले व त्यांचेपासून किती भाडें येणें होतें, हें खालील तक्त्यावरून समजून येईल:—

| रेल्वे | फुकट्या उतारूंची संख्या | रकम येणें |
|---|---|---|
| आसाम-बेंगाल | ६०,७०० | ६४,०४३ |
| बंगाल आणि नॉर्थ वेस्टर्न | १,३८,९८९ | २,३०,०८१ |
| बंगाल—नागपूर | २,०४,६३८ | १,७०,९८७ |
| बी. बी. अँड सी. आय. | ३,३५,६३५ | ५,५७,५८३ |
| ईस्टर्न बेंगॉल | २,४९,४९९ | २,४१,१९० |
| ईस्ट इंडियन | २,६४,९११ | ४,१७,६०८ |
| जी. आय. पी. | २,०४,२०६ | २,१८,३२६ |
| जोधपूर | ४३,६५३ | ४२,४७२ |
| एम. एस. एम. | १,४५,२४३ | १,१४,९१९ |
| म्हैसूर स्टेट | १०,५७३ | ४,९८९ |
| नायझॅम स्टेट | ७,४३० | १०,२०५ |
| नॉर्थ वेस्टर्न | १,८३,०५६ | ४,७९,२०४ |
| रोहिल खंड अँड कुमॉन | ५५,०५९ | ४४,७९१ |
| साउथ इंडियन | १,५७,८९७ | १,३०,७८७ |
| | २४,६१,५९९ | २८,९३,५१९ |

---

## म्हैसूर शुगर कंपनी

### सर्वांत मोठा हिंदी साखरेचा कारखाना

म्हैसूर संस्थानच्या मदतीनें निघालेला तेथील साखरेचा कारखाना हिंदुस्थानांतील साखरेच्या कारखान्यांमध्यें सर्वांत मोठा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा कारखाना निघून सात वर्षें झालीं असून ह्या अवधींत त्याचा विस्तार झपाट्यानें चालला आहे. त्यामध्यें निघणाऱ्या आणि वाया जाणाऱ्या काकवीची दारू आणि प्रेरक ऑल्कोहॉल बनवण्याची व्यवस्था म्हैसूर सरकारनें केली असल्याकारणानें उंसाची लागवड व साखरेचें उत्पादन ह्यांस तेथें जोरानें उत्तेजन मिळालें आहे. गेल्या जून महिन्यांत पुऱ्या झालेल्या वर्षाकरितां म्हैसूर शुगर कंपनीनें १० टक्के डिव्हिडंड व १० टक्के बोनस ह्यांप्रमाणें २० टक्के नफा भागीदारांस वाटला आहे आणि गंगाजळ्या, घसारा इत्यादिसाठी भरपूर तरतूद करून ती हें करूं शकली आहे. ह्यावरून गेल्या वर्षांतल्या अनुकूल परिस्थितीचा फायदा तिनें कसा करून घेतला आहे, ह्याची कल्पना येते.

ह्या कंपनीची वार्षिक सभा नुकतीच झाली, त्याप्रसंगीं तिच्या अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत जी माहिती दिली, ती बोधप्रद असल्यानें तिचा गोषवारा आम्हीं येथें देत आहों. २४ जुलै, १९३९ ते २१ डिसेंबर, १९३९ आणि २० जानेवारी, १९४० ते २७ मे, १९४० ह्याप्रमाणें २६७ दिवस कारखान्याचें काम चाललें. ३ लक्ष टन ऊंस गाळण्यांत आला, त्यापैकीं बहुतेक खाजगी शेतकऱ्यांकडून कराराप्रमाणें विकत घेण्यांत आला आणि फारच थोडा कंपनीच्या स्वतःच्या शेतांतला होता. तयार झालेली एकूण साखर ३० हजार टन भरली. एवढें उत्पादन करणारा म्हैसूरचा कारखाना सबंद हिंदुस्थानांत एकच आहे. गेल्या हंगामांत साखरेचे भाव चढेच राहिले. त्याबरोबरच, कारखान्यांस लागणाऱ्या सामुग्रीच्या किंमतीहि वाढलेल्या राहिल्या. ह्या कारणानें उत्पादनखर्च अधिक झाला, तरीहि डिबेंचर्सवरचें व्याज देऊन आणि घसारा बाजूस काढून कंपनीनें २६ लक्ष रुपये निवळ नफा मिळवला. प्राप्तीवरील कर वजा जातां ताळेबंदांत १९½ लक्ष रुपये नफा खालीं राहिला. त्यांतून १० टक्के करमाफ डिव्हिडंड व १० टक्के बोनस दिल्यानंतर उरलेली रकम निरनिराळ्या फंडांत कंपनीच्या सुरक्षिततेच्या व पुढें येऊं पहाणाऱ्या मंदीच्या दृष्टीनें टाकण्यांत आली आहे. भागीदारांस आणखी नफा वाटतां आला असता, असें कित्येकांचें म्हणणें आहे, पण तें अदूरदर्शीपणाचें आहे. पुढेंहि सारखें डिव्हिडंड वाटतां यावें म्हणून गंगाजळींत एव्हांपासून पैसा साठवून ठेवणें अगत्याचें आहे. गेल्या वर्षीच्या उत्पादनापैकीं सुमारें ४ लक्ष टन साखर संयुक्तप्रांत व बहार येथें शिल्लक आहे आणि चालू हंगामांत मोठ्या प्रमाणांत उत्पादन होणार आहे. उत्तर हिंदुस्थानांतील कारखाने आणि त्यांची प्रांतिक सरकारें ह्यांनीं साखरेचे भाव मर्यादेबाहेर जाणार नाहींत ह्याविषयीं खबरदारी घेतली पाहिजे. मंड्या येथील वाल्योळ्याच्या कारखान्यांत म्हैसूर साखर कारखान्यांतील काकवीचा चांगला उठाव झाला. तेथें तयार झालेला ऑल्कोहॉल मोटारींत वापरण्यांत येणाऱ्या पेट्रोलमध्यें १५ टक्के मिश्रित केला पाहिजे असा सरकारी कायदा आहे. त्याची अंमलबजावणी समाधानकारक रीतीनें चालली आहे. म्हैसूरचा कारखाना यशस्वी झाला आहे, ह्याचें बहुतेक श्रेय संस्थानच्या उदारधोरणी सरकारास आणि त्याच्या निरनिराळ्या खात्यांकडून मिळणाऱ्या सहकार्यास आहे.

## स्फुट विचार

### " राणीछापा " चे रुपये व्यवहारांतून काढून घेणार

व्हिक्टोरिया राणी छापाचे रुपये हिंदुस्थानांत अजून प्रचलित आहेत. पण ते अनेक वर्षें व्यवहारांत खेळल्यामुळें त्यांतले पुष्कळसे झिजून गेले आहेत. लोकांच्या संग्रहीं राहिल्यानें कांहीं मधून मधून चांगल्याहि स्थितींत बाहेर येतात. तथापि, हीं नाणीं जुनींपुराणीं झाल्याकारणानें तीं जनतेंत फारशीं प्रिय नाहींत. राणीछापाच्या रुपयांमध्यें खोट्या नाण्यांचाहि सुळसुळाट झाला आहे. ह्या कारणानें त्यांचेविषयींची अप्रियता वाढली आहे. ह्या परिस्थितीवर उपाय म्हणून व्हिक्टोरिया राणीछापाचे रुपये आणि अधेल्या व्यवहारामधून काढून घेण्याचें सरकारनें ठरवलें आहे. सरकारनें कायदेशीर ठरवलेलीं नाणीं देवघेवींमध्यें स्वीकारण्याची सक्ति नागरिकांवर असते. हा कायदाच सरकारनें दुरुस्त करून राणीछापाचे रुपये स्वीकारण्याची जबाबदारी आणि देण्याचा हक्क हीं नाहींशीं केलीं म्हणजे सदरहु नाणीं व्यवहारांत खेळण्याचें बंद पडून जनतेची सध्यांची गैरसोय दूर होईल. हिंदुस्थान सरकारनें एक वटहुकूम काढला आहे, त्या अन्वयें हिंदी चलनाच्या कायद्यांत दुरुस्ती झाली आहे. दुरुस्त कायद्याखालीं सरकारनें असें जाहीर केलें आहे कीं, ३१ मार्च, १९४१ च्या पुढें व्हिक्टोरिया राणीछापाचे रुपये आणि अधेल्या व्यवहारांत स्वीकारण्यास कोणीहि बांधलेले रहाणार नाहीं आणि ते घेतलेच पाहिजेत असा कायदेशीर आग्रह देणारास धरतां येणार नाहीं. हीं नाणीं वरील तारखेच्या पुढें " कायदेशीर नाणीं " समजलीं जाणार नाहींत, ह्या जाहीरनाम्याचा हाच सरळ अर्थ आहे. तथापि, अनेक लोकांच्या संग्रहीं हीं नाणीं रहाण्याचा संभव असल्यानें त्यांचें नुकसान होणार नाहीं अशी व्यवस्था होणें अगत्याचें आहे. ह्याकरितां सरकारनें असें जाहीर केलें आहे कीं, ३० सप्टेंबर, १९४१ पावेतों राणीछापाचे रुपये आणि अधेल्या सरकारी तिजोऱ्या आणि पोस्ट ऑफिसें ह्यांचेमध्यें स्वीकारण्यांत येतील. त्याच्याहि पुढें त्यासंबंधांत नवीन जाहीरनामा निघेपर्यंत रिझर्व्ह बँकेच्या मुंबई व कलकत्ता येथील इशू खात्याच्या कचेऱ्यांत तीं स्वीकारलीं जातील.

---

### जर्मनीचे अंकित देश आणि त्यांचा अमेरिकेंत पैसा

शक्यतोंवर युद्धामध्यें प्रत्यक्ष रीतीनें आपल्या राष्ट्रानें पडावयाचें नाहीं असें अमेरिकेंतील कांहीं पुढारी मुत्सद्यांचें मत असलें तरी जर्मनी, इटली व जपान ह्या त्रिकुटाच्या कारवायांमुळें त्यांस आपलें धोरण बदलणें भाग पडेल अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. अमेरिका खंडाच्या संरक्षणाची तयारी अमेरिकन राष्ट्रानें झपाट्यानें चालवली आहे. जर्मनी व जपान ह्यांची राज्यतृष्णा अनावर झाली आहे आणि तिला मर्यादा घालण्याचे कामीं व त्या रीतीनें स्वतःचें संरक्षण करण्याचे कामीं शस्त्र उचलणें अमेरिकेस लवकरच प्राप्त होणार आहे. इंग्लंडला युद्धांत मदत करणें म्हणजे स्वतःच्या लोकशाहीचें व स्वातंत्र्याचें संरक्षण करणें होय, हें मत अमेरिकन जनतेंत पसरत आहे याचें कारण हेंच आहे. अमेरिकन मुत्सद्यांस सोडवावयाचे जे अनेक बिकट प्रश्न आहेत, त्यामधील एकाचा उल्लेख येथें आम्ही करीत आहों. जर्मनीनें पादाक्रांत केलेल्या युरोपिअन राष्ट्रांची जनता व सरकार ह्यांच्या मालकीचा पैसा निरनिराळ्या स्वरूपांत अडकून पडला आहे आणि तो अमेरिकन सरकारनें मोकळा होऊं दिलेला नाहीं. हें धोरण सदरहु राष्ट्रांस अन्यायकारक असल्याचा कांगावा जर्मनी केल्यावांचून रहाणार नाहीं आणि त्यांच्या वतीनें तंटा उपस्थित करण्याचा डाव टाकील. त्या राष्ट्रांच्या मालकीचे अमेरिकेंतले पैसे स्वतःच्या सोयीसाठीं उचलून त्यांच्या मोबदला स्वतःचें कागदी चलन त्यांच्या हातांवर ठेवण्याची हिकमत जर्मनी लढवण्यास कचरणार नाहीं. ह्या मार्गानें अमेरिकन डॉलर्स मिळवून त्यांचा उपयोग स्वतःची सांपत्तिक स्थिति सुधारण्याकडे जर्मनी करील आणि त्यांत बिचाऱ्या पादाक्रांत झालेल्या राष्ट्रांचें नुकसान व्हावयाचें तें होईलच. ह्या राष्ट्रांत अमेरिकेचें भांडवल गुंतलेलें असलें तरी तें वजा जाऊनहि त्यांचें अमेरिकेकडून घेणेंच पुष्कळ रहातें. हा पैसा परत करावयाचा म्हटलें तर तो मालाच्या स्वरूपांत करावा लागेल आणि ह्या मालाचा उपयोग युद्धासाठीं जर्मनी करील ह्यांत शंका नाहीं. जर्मनीच्या पंजाखालील युरोपिअन राष्ट्रांच्या अमेरिकेंतल्या देण्याघेण्याची परिस्थिति कशी आहे ह्याची कल्पना खालीं दिलेल्या आंकड्यांवरून येईल:—

| | जर्मनीच्या ताब्यांतील देशांचा अमेरिकेंत पैसा | अमेरिकेचा फ्रान्स वगैरे देशांत गुंतलेला पैसा |
|---|---|---|
| | ( लक्ष डॉलर ) | |
| फ्रान्स | ६,००० | १,५९० |
| बेलजम | ३,००० | ७३० |
| हॉलंड | १०,७५० | २८० |
| डेन्मार्क | ४४० | १,०५० |
| नॉर्वे | ७५० | ९६० |
| | २०,९४० | ४,६१० |

फ्रान्सच्या वसाहतींत अमेरिकेचे १,७३० लक्ष डॉलर गुंतलेले आहेत, ते वरील उजव्या बाजूच्या रकमेंत मिळवले तरी जर्मनीच्या वर्चस्वाखाली असलेल्या युरोपांतील देशांचे अमेरिकेमध्यें पैसे अडकले आहेत, ते अमेरिकेच्या त्यांत गुंतलेल्या एकूण रकमेच्या तिप्पट आहेत. स्वीडन व स्वित्सर्लंड हे देशहि हिशेबांत घेतले तरी वरील प्रमाण कायम रहातें. वरील एकूण रक्कम सुमारें ७०० कोटि रुपये होते आणि तिच्यावर जर्मनीचा डोळा असणें सहाजिक आहे. ह्या पैशाची मागणी जर्मनीनें अमेरिकेकडे अजून केलेली नाहीं. पण फ्रान्सच्या मार्फत कांहीं कुरापत जर्मनी काढण्याचा संभव आहे. त्याचा विचार अमेरिकन मुत्सद्यांस केला पाहिजे.

---

### सुएझच्या कालव्यामधून जहाजांची वहातुक

युद्धपरिस्थितीमुळें सुएझच्या कालव्याचा व्यापारी जहाजांच्या वहातुकीचा मार्ग बंद झाला आहे. सुरक्षितपणासाठीं ब्रिटिश व्यापाराची वहातुक ह्या सोयीच्या व अल्प अंतराच्या मार्गानें न होतां आडवाटेनें करावी लागत आहे हें सर्वश्रुत आहे. सुएझ कालवा ब्रिटिश हुकमतीखाली असल्यानें इटली व जर्मनी ह्यांच्या जहाजांच्या त्या बाजूच्या हालचाली बंद पडल्या आहेत, हें येथें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. ह्या कालव्यामधून मालाची ने-आण करणाऱ्या आगबोटींची राष्ट्रवार वाटणी १९३९ मध्यें कशी होती ह्याची माहिती पुढें दिली आहे:—

**राष्ट्रवार जहाजांची वांटणी**

| राष्ट्र | जहाजांची संख्या | एकूण संख्येशी प्रमाण | निव्वळ वजन (लक्ष टन) | एकूण वजनाशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ब्रिटिश | २,६२७ | ४९.७८ | १५२ | ५१.४३ |
| इटालिअन | ८८४ | १६.७५ | ४२ | १४.४३ |
| डच | ४११ | ७.७९ | २४ | ८.२७ |
| जर्मन | ३२६ | ६.१८ | २० | ६.९८ |
| फ्रेंच | २३५ | ४.४५ | १६ | ५.४५ |
| नॉर्वेजिअन | २४६ | ४.६६ | १२ | ४.३४ |
| ग्रीक | १४९ | २.८२ | ५ | १.८६ |
| जपानी | ७९ | १.५० | ५ | १.८४ |
| डॅनिश | ९३ | १.७६ | ४ | १.६४ |
| अमेरिकन | ७० | १.३२ | ४ | १.५१ |
| इतर | १५७ | २.९९ | ६ | २.२५ |
| एकूण | ५,२७७ | १०० | २९५ | १०० |

सुएझ कॅनॉलमधून होणाऱ्या आगबोटींच्या वहातुकींत ब्रिटिश व्यापाराचा अंश किती मोठा होता हें वरील तक्त्यावरून दिसून येईल. ब्रिटिश राष्ट्राचा व्यापार मोठ्या प्रमाणांत ह्या मार्गानें चालत आलेला आहे आणि तो बंद झाल्यामुळें पुष्कळ गैरसोय होत आहे ह्यांत संशय नाहीं. तथापि, ब्रिटिश व्यापारास दुसऱ्या दिशा मोकळ्या असून शत्रु राष्ट्रांचा समुद्रावर पूर्णपणें कोंडमारा झाला आहे, हें येथें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

### जर्मनीची रुमानियांतील कारवाई

हिटलर आणि मुसोलिनी ह्यांचें नुकतेंच सलवत झालें, त्यांत युद्धपरिस्थितीचें सिंहावलोकन आणि पुढची तजवीज ह्यांविषयींची चर्चा झाली असली पाहिजे. ब्रिटिश वैमानिक दलानें शत्रूच्या युद्धाच्या दृष्टीनें महत्वाच्या असलेल्या ठिकाणांवर हल्ले चढवण्याचा क्रम अव्याहत रीतीनें चालू ठेवला असल्यानें इंग्लंडवरच्या स्वारीचा बेत हिटलरला पुढें ढकलावा लागला आहे. जर्मन विमानें इंग्लंडवर दररोज येत आहेत, पण त्यांचा नाश सारखा होत आहे. ब्रिटिश इमारतींचें थोडेंबहुत नुकसान होत असलें तरी जर्मन हल्ल्यांचा प्रतिकार करण्याचें भरपूर सामर्थ्य इंग्लंडमध्यें असल्याची जाणीव शत्रूंमध्यें उत्पन्न झाली आहे. जर्मनीमध्यें ब्रिटिश विमानांनीं केलेल्या पराक्रमाचा परिणाम तेथील जनतेच्या मनावर झाल्यावांचून रहाणें अशक्य आहे. इकडे इटलीची इजिप्तच्या बाजूची प्रगति खुंटल्यासारखी झाली आहे. त्या बाजूस भूमध्यसमुद्रांतलें ब्रिटिश आरमाराचें वर्चस्व अबाधित आहे आणि लिबियांत ब्रिटिश वैमानिकांनीं इटालियन लढाऊ साधनांचा नाश करण्यांत यश संपादलें आहे. असल्या प्रतिकूल परिस्थितींत "पुढें काय ?" हा प्रश्न हिटलर व मुसोलिनी ह्यांस सतावूं लागला आहे आणि त्याचा विचार करण्यासाठींच त्यांनीं परस्परांची भेट मुक्तीच घडवून आणली. ह्या विचारविनिमयांत पुढील बेतांचें स्वरूप त्यांनीं ठरवलें असलें पाहिजे. तें काय आहे हें लवकरच दिसून येईल. तूर्त, रुमानियामध्यें जर्मन फौजा गेल्या असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत.तेथील तेलाच्या विहिरींचें संरक्षण करणें हा ह्या हालचालींचा दिखाऊ उद्देश असला तरी रुमानिया, हॉलंड,बेल्जमप्रमाणें पूर्णपणें आपल्या सत्तेखालीं आणून काळ्या समुद्रापर्यंत आपलें घोडें त्या देशांमधून दामटावयाचें आणि बाल्कन देशांचा उपयोग भूमध्य समुद्राच्या बाजूस लढाई नेऊन भिडविण्याचा हेतु हिटलरच्या मनांत असावा असें वाटण्यास जागा आहे.प्रत्यक्ष इंग्लंडच्या विरुद्ध आपलें कांहीं चालत नाहीं, तर पूर्वेच्या बाजूस त्यास शह द्या, असा त्याचा डाव असावा. ह्या घटनेचें तुर्कस्तान डोळ्यांत तेल घालून निरीक्षण करीत आहे आणि रशियाहि त्या योगानें साशंक होणार ह्यांत संशय नाहीं. फ्रान्सप्रमाणें इंग्लंडमध्यें हातपाय पसरण्याचा हिटलरचा व्यूह ढासळल्यासारखा दिसत आहे. आणि त्याचा पुरावा त्यानें रुमानियामध्यें चालवलेल्या कारवायांमध्यें प्रतीत होत आहे. इटलीच्या लढाईमध्यें तो प्रत्यक्ष हात घालतो कीं काय हें लवकरच स्पष्ट होईल.

### निर्गत व्यापारांत घट

युरोप खंडाशीं हिंदुस्थानाचा होणारा व्यापार आतां जवळ जवळ थांबल्यासारखाच आहे. जपानहून मालाची आयात पूर्वीसारखीच होत असून येथील मालाची जपानास होणारी निर्गत मात्र घटत आहे. इंग्लंड व जपान ह्यांच्यांतील परस्पर संबंध शत्रुत्वाचे झाल्यास हाहि व्यापार संपुष्टांत येईल. पूर्वेकडील समुद्रांत अशांतता माजल्यास हिंदुस्थान व अमेरिका ह्यांमधील व्यापारासहि धोका उत्पन्न होतो किंवा काय हें पाहिलें पाहिजे. सुदैवानें युनायटेड स्टेटस व इंग्लंड ह्यांमध्यें आरमारी व इतर संरक्षक बाबतींत वाढतें सहकार्य होत आहे. इंग्लंडप्रमाणें अमेरिकेसहि युद्ध साधनांचा पुरवठा मोठ्या प्रमाणांत वाढविणें जरूर पडत आहे. युद्धाच्या ह्या तयारीस लागणारा अनेक तऱ्हेचा कच्चा माल हिंदुस्थानांतून मिळण्यासारखा आहे. ऑस्ट्रेलिया व हिंदुस्थान ह्यांमधील व्यापारी संबंध अधिक दृढ होणें शक्य आहे. चीन व पूर्वेकडील बेटें, आणि पश्चिमेस मध्य एशिया व आफ्रिका ह्यांमध्यें हिंदुस्थानचे खास व्यापारी प्रतिनिधी पाठवून तेथें लागणारा कोणता माल आपणांस किफायतशीरपणें पाठवितां येईल ह्याची चौकशी झाली पाहिजे. ह्याप्रमाणें ब्रिटिश व हिंदुस्थान सरकार ह्यांच्या सहकार्यानें आपल्या निर्गत व्यापाराची पुनर्घटना न केल्यास देशाची फार मोठी आर्थिक हानी होणार आहे. निवळ युद्धाप्रीत्यर्थ इंग्लंडकडून होणाऱ्या मालाच्या उठावानें आपण निर्धास्त राहतां कामा नये.

### अनुकूल व्यापारी आढाव्याचें महत्त्व

सरकारचा इंग्लंडमधील खर्च व येथील परकी धंदेवाल्यांची कमाई हीं मोठीं कर्जखातीं आपणांस दर वर्षी भागवावयाचीं असल्यानें आयात मालाच्या किंमतींहून निर्यात मालाची किंमत सुमारें ६०-७० कोटींनें अधिक असेल असें व्यापारी धोरण ठेवणें हिंदुस्थान सरकारास जरूर असतें. शेतकऱ्यांच्या मालाच्या किंमती परराष्ट्रीय मागणीवरच बहुंशीं अवलंबून आहेत. येथील उद्योगधंद्यांच्या वाढीनें कच्च्या मालास असलेली मागणी थोडीशी चढेल; परंतु तेवढ्यानें बाजारभाव तेजीचे राहण्यास मदत होणार नाहीं. उद्योगधंद्यांच्या वाढीस लागणारी यंत्रसामुग्री व कांहीं विशिष्ट साधनें परदेशाहून आणावीं लागतात, त्यांचें देणें भागविण्यासहि मालाची निर्यात जोमदार असणें जरूर आहे. इंग्लंडच्या युद्धविषयक सामर्थ्यानें त्या राष्ट्राशीं आपला व्यापार वाढत आहे; परंतु एकंदर आयातीच्या मानानें निर्यातींत पुष्कळच अधिक वाढ झाल्यावांचून शेतकी मालाचे बाजारभाव सुधारण्यास व एकंदर उद्योगधंद्यांचे चक्र प्रगतीच्या मार्गानें फिरावयास लागणार नाहीं. हिंदुस्थान सरकारचे आर्थिक सल्लागार डॉ. ग्रेगरी हे ह्या बाबतींत सरकारास योग्य सल्ला देतील अशी आशा आहे. अमेरिका व ऑस्ट्रेलिया ह्या देशांस प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्याशीं असलेला हिंदुस्थानचा व्यापार वाढविण्याची ते जी खटपट करीत आहेत त्यांत त्यांस यश चिंतणें राष्ट्रहिताचें आहे.

### जपानी सायकली

१८८० च्या सुमारास जपानमध्यें पहिली सायकल परदेशांतून आणण्यांत आली. त्यावेळीं सायकल ही चैनीची वस्तु समजली जात असे. आज हरघडी लागणाऱ्या नित्य व्यवहारांतील वस्तूंत तिची गणना होते. जपानमध्यें दर दहा माणशी एक सायकल असें प्रमाण आज पडत आहे.

१९१४ च्या महायुद्धांत इतर जपानी उद्योग-धंद्यांबरोबर सायकली तयार करण्याच्या धंद्यासहि तेजी आली. १९०४-०५ च्या रूसो-जपानी युद्धानंतर जपानमध्यें सायकलींचे निरनिराळे भाग करण्याचे कारखाने निघाले व गेल्या महायुद्धामुळें परदेशी बाजारपेठ काबीज करण्याची संधि जपानला सांपडली. हिंदुस्थानांत जपानी सायकली येऊं लागल्या त्या गेल्या महायुद्धापासूनच.

१९२९ सालीं मंदी सर्वत्र पसरली. त्याचा परिणाम म्हणजे सायकली व त्यांचे निरनिराळे भाग तयार करणाऱ्या कारखान्यांची स्थिति विकट झाली. १९३२ च्या नोव्हेंबरपासून सायकलींच्या उत्पादनावर नियंत्रण घालण्यांत आल्यापासून त्या धंद्याची परिस्थिति सुधारली आहे.

जपानांतील उद्योग-धंद्यांचें एक वैशिष्ट्य आहे. तेथें मोठमोठाले कारखाने अगदींच कमी आहेत. घरगुती धंदे लहान, फार झाले तर मध्यम आकाराचे, सर्रहा असतात. प्रत्येक घटकाचें काम नेमलेलें असतें. त्यामुळें कमी खर्चात विशिष्ट गुणांचा माल तयार होतो. तो एका ठिकाणीं आणावयाचा, तेथें पुन्हां सरकारनें किंवा त्या त्या धंद्यांतील अधिकारी संस्थांनीं मालाची तपासणी करावयाची अशी तेथें पद्धति आहे. परदेशांत पाठवावयाच्या मालाबाबत तर फारच कसोशी बाळगण्यांत येते.

सायकली व त्यांचे निरनिराळे भाग तयार करण्याच्या धंद्याचें स्वरूप असेंच आहे. सायकलींचे जितके भाग तितके लहान-मध्यम कारखाने जपानमध्यें आहेत. त्यांत तयार झालेला माल एकत्र करण्याकरितां स्वतंत्र कारखाने आहेत. सायकलीचे निरनिराळे भाग तयार करून ते तेथेंच एकत्र करण्याची व्यवस्था असलेले तीनच कारखाने जपानमध्यें आहेत.

जपानी सायकलींची सारी निर्गत तें काम करण्यासाठीं स्थापन झालेल्या निर्गत–व्यापाऱ्यांच्या संस्थेच्यामार्फत होते. विशिष्ट गुणांचा माल विशिष्ट किंमतीसच परदेशी रवाना होत रहाण्याबद्दल ही संस्था दक्षता बाळगते. या संस्थेच्या अधिकाऱ्यांनीं तपासल्याशिवाय सायकलींची किंवा त्यांच्या निरनिराळ्या भागांची एकहि पेटी परदेशीं जात नाहीं. परदेशांत आपल्या मालाचा दर्जा कायम ठेवण्याकरितां चाललेले हे प्रयत्न हिंदुस्थानांत अनुकरणीय आहेत.

सायकली तयार करण्यापूर्वी त्यांस लागणारा निरनिराळा कच्चा माल जपानांत बाहेरून आणावा लागतो. लोखंडी पत्रे, पोलादी तारा, चामडें आणि रबर हे पदार्थ सायकलींकरितां लागणाऱ्या पदार्थांत मुख्य आहेत. सालिना १० लक्ष सायकली तयार करण्यास आज जपानी कारखाने सुसज्ज आहेत.

---

### चहाच्या धंद्यांत गुंतलेलें भांडवल

हिंदी चहाच्या धंद्यांत एकूण १९२ लिमिटेड कंपन्यांचें ५० कोटि रुपये भांडवल गुंतलेलें आहे.


भारत

दररोज
६,००० रुपयांपेक्षा अधिक
क्लेमसचे पैसे विमेदारांस
परत केले जातात.

भारत
इनूशुअरन्स कंपनी लिमिटेड

मुख्य कचेरीः भारत बिल्डिंग्ज, लाहोर

१८९६ मध्यें स्थापन झालेली

ब्रँच ऑफिस : लक्ष्मीरोड, पुणें.

दि गुड–वुइल
अॅशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारांस
भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंट्स नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा.

मॅनेजिंग डायरेक्टर

## दि आयुर्वेद रसशाळा पुणें, लिमिटेड

### अभिनंदनीय प्रगति

आयुर्वेद रसशाळा पुणें, लिमिटेडचा १९३९ जून ते १९४०मे अखेरच्या वर्षाचा ताळेबंद व नफातोटा-पत्रक आमचेकडे आलें आहे. कंपनी लिमिटेड होऊन फक्त ५ वर्षे झालीं असतांना सुद्धां सालोसाल होणारी तिची प्रगति लक्षांत घेण्यासारखी आहे. वृत्तांत वर्षांत कंपनीनें भांडवलाची वाढ केली आहे. आतां ५ लाख रुपये अधिकृत भांडवलाची कंपनी आहे. त्यापैकीं ऑर्डिनरी व प्रेफरन्स शेअर्स कंपनीनें विक्रीस काढले असून ते अनुक्रमें प्रत्येकीं रु. २५ व १०० चा एक असे आहेत.

वृत्तांत वर्षांत कंपनीनें इमारतीकरितां सोयीची अशी सुमारें साडेतीन एकर जमीन खरेदी केली आहे.

गतवर्षीपेक्षां विक्रीचें प्रमाणांत भरपूर वाढ झाल्यामुळें नफ्याचें प्रमाणांत वाढ झाली आहे. पहिल्याच वर्षी प्रेफरन्स शेअरवरील ५ टक्के व्याज देऊनही ऑर्डिनरी शेअर्सवर ९ टक्के नफा वांटता आला. कंपनीची अशीच वाढ होत गेल्यास यापेक्षां अधिक नफा वांटतां येईल असें वाटतें.

आयुर्वेद रसशाळा पुणें, लि. चें वैशिष्ट्यः—

(१) येथें तयार होणारीं सर्व औषधें प्रथम पुणें येथील सुप्रसिद्ध शेठ ताराचंद रामनाथ आयुर्वेदीय हॉस्पिटलमध्यें रोग्यांवर वापरून गुणकारी ठरल्यावरच बाहेर विक्रीस काढलीं जातात.

(२) मॅनेजिंग एजंट्स ही कोणी व्यक्ती नसून ती शिक्षण संस्था आहे व त्या संस्थेतर्फे मॅनेजिंग एजंट्स म्हणून काम करणारे निर्वेतन काम करतात व त्याचा मोबदला म्हणून निम्मा नफा राष्ट्रीय शिक्षण मंडळास दिला जातो व त्याचा विनियोग आयुर्वेदाचे उच्च शिक्षणाकडे केला जातो.

सवरहू कंपनीनें लोकोपयोगी अशीं उत्तम प्रकारची नवी पेटंट औषधें यंदाचे सालीं काढलीं असून त्याचा खपही वाढत्या प्रमाणांत आहे. त्यांतल्या त्यांत एक वाढविणारी म्हणून जीं अनेक परदेशी औषधें हिंदुस्थानांत आयात होतात त्याचा खप कमी करण्यास मदत करणारें व डॉक्टर लोकांनीं अवश्य वापरून पाहण्यासारखें व उत्तम असें रक्तवर्धक नांवाचें पेटंट औषध कंपनीनें नुकतेंच काढलें आहे व त्याचा खपही बराच वाढला आहे.

अशा राष्ट्रीय वृत्तीच्या व आयुर्वेदाचे शिक्षणास मदत करण्यासाठी स्थापन झालेल्या कंपनीस भाग घेऊन तिला मदत केल्यास आयुर्वेदाचे शिक्षणास उत्तेजन मिळून स्वतःचाही फायदा होईल हें उघड आहे.

---


### हिंदी रेल्वेजचा वक्तशीरपणा

उतारूंच्या एकूण आगगाड्यांशीं वक्तशीर गेलेल्या गाड्यांचें प्रमाण काढलें असतां, १९३७-३८चे मानानें १९३८-३९ सालीं हिंदी रेल्वेजवरील उतारूंच्या आगगाड्यांचा वक्तशीरपणा थोडा कमी झाला, असें आढळतें. १९३७-३८ मध्यें हें प्रमाण ब्रॉड गेजवर ८३·५% व मीटर गेजवर ८५·५% होतें. १९३८-३९ चे तत्सम आकडे अनुक्रमें ८०·९% व ८२·९% असे आहेत. उतारूंच्या आगगाड्यांची झालेली अधिक वहातुक, मालाच्या आगगाड्यांच्या वहातुकींत वाढ व त्यामुळें उतारूंच्या आगगाड्यांची झालेली खोटी, नवीन बांधणीचीं व दुरुस्तीचीं चाललेलीं कामें, कांहीं इंजनांचे वेगावर घातलेलें नियंत्रण व कांहीं वेगवान इंजनांस दिलेली रजा, इत्यादि कारणांमुळें वक्तशीरपणास थोडा बाध आला.


# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर




लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखविल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून त्याचा तसाच आवाज होतो. त्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. त्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ७५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारास सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हशील माफ.

पत्ता:—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)


X·2m·N35
110

## मुंबई प्रांतांतील शिक्षणप्रगति

### टेक्निकल व धंदेशिक्षण.

या शाळांची संख्या १० होती ती ७३ झाली आणि त्यामधील विद्यार्थ्यांच्या संख्येंत ८७३ ची वाढ होऊन ती संख्या ५,०५९ झाली. अशा शाळांवर होणारा खर्च रु. ६०,२३९ नें वाढून तो एकंदर रु. ६·९६·३१३ झाला.

### दुय्यम शिक्षण

दुय्यम शिक्षणाच्या शाळांची संख्या ५४ नें वाढून ती एकूण ७३० झाली आणि त्यामधील विद्यार्थ्यांच्या संख्येंत १३,८६० विद्यार्थ्यांची भर पडून ती एकूण १,५२,२५६ इतकी झाली. पुढील कोष्टकांत हायस्कूल्स व मिडलस्कूल्स यांच्यासंबंधीं तपशील वेगवेगळा दिला आहे:—

| | | शाळांची संख्या. | विद्यार्थ्यांची संख्या. |
|---|---|---|---|
| हायस्कूल्स | मुलांचीं | २७२ | १,०४,६९८ |
| | मुलींचीं | ६६ | १९,५५१ |
| मिडल स्कूल्स | मुलांचीं | ३४६ | २३,४६२ |
| | मुलींचीं | ४६ | ४,५४५ |
| | एकूण | ७३० | १,५२,२५६ |

दुय्यम शिक्षणाच्या शाळांवरील खर्चांत ६·८ लाख रुपयांची वाढ होऊन तो एकंदर ९३·२ लाख रुपये झाला.

### प्राथमिक शाळा

मुलांच्या प्राथमिक शाळांच्या संख्येमध्यें ३,१२० ची वाढ होऊन ती १४,८७१ झाली आणि त्यांतील विद्यार्थ्यांच्या संख्येमध्यें १,२३,९२६ ची वाढ होऊन ती एकंदर ११,२९,८३६ इतकी झाली. मुलींच्या प्राथमिक शाळांच्या संख्येमध्यें ७१ ची भर पडून एकंदर शाळांची संख्या १,५६४ झाली आणि त्यांतील विद्यार्थ्यांच्या (मुलें व मुली मिळून) संख्येंत ७,२३३ ची वाढ होऊन ती एकंदर १,९२,८३२ इतकी झाली. मुलें व मुली यांसाठीं असलेल्या प्राथमिक शाळांतील मुलींची संख्या ३,३६,७१८ होती म्हणजे (मागील वर्षाच्या संख्येंत) ३२,५६८ ची वाढ झाली.

पुढील कोष्टकांत प्राथमिक शाळांबाबतचा तपशील त्यांच्या नियामक संस्थांच्या अनुरोधानें दिला आहे.

| | | शाळा. | विद्यार्थी. |
|---|---|---|---|
| सरकारी | ... | ४० | ६,६०६ |
| डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड | ... | ९,५९० | ६,९७,५४१ |
| म्युनिसिपल | ... | १,६३७ | ३,६३,११९ |
| मदत मिळणाऱ्या | ... | ४,८५० | २,३९,८०८ |
| मदत न मिळणाऱ्या | ... | ३१८ | १५,५९४ |
| एकूण | ... | १६,४३५ | १३,२२,६६८ |

प्राथमिक शाळांवर झालेला एकूण प्रत्यक्ष खर्च १९१·९ लक्ष होता. गेल्या वर्षी (१९३७-३८) तो १८२·४ लक्ष होता. एकूण खर्चापैकीं रु. ११६·२ लक्ष सरकारी फंडांतून झाला, रुपये ११ लक्ष डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डाच्या फंडांतून झाला, रुपये ४३ लक्ष म्युनिसिपल फंडांतून झाला, रुपये ७·७ लक्ष फीमधून झाला. आणि रुपये १४ लक्ष इतर मार्गांनीं झाला.

रात्रींच्या शाळा ६७२ होत्या व त्यांत २२,०९५ विद्यार्थी होते.


सर्व तऱ्हेचीं कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

'पायोनियर डाइंग हाऊस'

कोचाचें कापड (Casement cloth) दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः— मिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.



दि

'बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो

बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट

पुणें शाखा — डेक्कन जिमखाना



दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| आधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१३,००,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र ऑफिस), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्केअर), जमशेदपूर, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष). श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के., के. टी. (रजेवर); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, मि. आर. एल. फेरार्ड.

करंट डिपॉझिट अकाउंटस :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जाते. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टांचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## सहकारी संस्थांचे अहवाल

### दि सांगली स्टेट सेंट्रल को. बँक लि., सांगली

वरील बँकेचें वसूल भांडवल ६४,३७० रुपयांचें आहे. रिझर्व्ह फंड २८,००० रुपयांचा असून इतर फंड ३६,३९९ रुपयांचे आहेत. अहवालाचे वर्षअखेर बँकेकडे ३,७४,६४३ रुपयांच्या ठेवी होत्या. बँकेजवळील सरकारी रोखे, पोर्ट ट्रस्ट डिबेंचर्स व बँकांचे भाग यांची दर्शनी किंमत १,६०,०५० रुपये असून त्यांत गुंतविलेली रकम १,७०,७२७ रुपये आहे. बँकेनें दिलेल्या कर्जांची येणें रकम २,१९,३३० रुपये आहे. पैकीं २,०८,१४४ रुपये को. सोसायट्यांना दिले आहेत. अहवालाचे वर्षी बँकेस ११,९०२ रुपयांचा निव्वळ नफा झाला. त्यांतून रिझर्व्ह फंडास ३,०६० रुपये व ६½% दरानें डिव्हिडंड वाटण्यास ३,९९६ रुपये देण्याचें ठरलें. वार्षिक सभा ता. २२-९-४० रोजीं झाली.

---

### श्री महालक्ष्मी को. बँक लि., कोल्हापूर

वरील बँकेचें ८,७०० रुपयांचें भाग भांडवल वसूल झालेलें आहे. कर्ज-जिंदगी पत्रकांत रिझर्व्ह व इतर फंड यांची एकूण रकम ३,१६४ रुपये दाखविली आहे. बँकेकडे ७०,९६३ रुपयांच्या ठेवी अहवालाचे वर्षअखेर होत्या. बँकेनें दिलेल्या कर्जांची येणें रकम ४२,८०१ रुपयांची होती. अहवालाचे वर्षाचे शेवटीं बँकेस १,७०८ रुपयांचा नफा झाला. त्यांतून रिझर्व्ह फंडाकरितां ४२८ रुपये व डिव्हिडंडकरितां ६०८ रुपये देण्याचें ठरलें.

---

### पुणें सेंट्रल को. बँक लि. पुणें

वरील बँकेची ता. २२ सप्टेंबर रोजीं निवडणूक होऊन व्यक्तिशः भागीदारांतर्फे श्री. के. व्ही. केळकर, ध. रा. गाडगीळ, ना. वि. भोंडे, म. घों. विद्वांस, ग. म. गुते, श्री. रा. पाळंदे व रा. सा. पी. डी. कुलकर्णी हे निवडून आले. गेल्या वर्षीप्रमाणेंच श्री. वाय. डी. सोले हे बोर्डावर कलेक्टरांचे प्रतिनिधि म्हणून नेमण्यांत आलेले आहेत. श्री. भोंडे व श्री. सावंत ह्यांची अनुक्रमें चेअरमन व व्हाइस चेअरमन अशी निवडणूक झाली. सभेंत ४% डिव्हिडंडची नफावाटणी मंजूर करण्यांत आली.

---

### अर्बन को. बँक लि., सांगली

अहवालाचे वर्ष अखेर वरील बँकेचे २५,१९० रुपयांचें भांडवल ४२४ सभासदांनीं घेतलेलें आहे. बँकेचा रिझर्व्ह फंड १,४७० रुपयांचा असून इतर फंड ९५२ रुपयांचे आहेत. सालअखेर २,०५,९६० रुपयांच्या ठेवी होत्या. बँकेनें दिलेलें कॅश क्रेडिट, कर्जें वगैरे ७४,९८९ रुपयांचीं असून सोनें, माल वगैरेंच्या तारणावर दिलेली रकम ८१,१७१ रुपयांची आहे. गेल्या वर्षीपेक्षा या वर्षी थकबाकीची रकम बरीच कमी असून "थकबाकी बुडीत होण्याचा संभव नाहीं." अहवालाचे वर्षी निव्वळ नफा ४,०७० रुपयांचा झाला; त्यांतून ६¼% दरानें १,५०० रुपये डिव्हिडंडकरितां वाटण्यांत आले. बँकेची वार्षिक सभा ११-८-४० रोजीं झाली.

---

### दि पुणें सें. को. बँक स्टाफ को. क्रे. सो. लि. पुणें

वरील सोसायटीचे सभासद ४५ असून वसूल भांडवल ९,०४० रुपयांचें आहे. रिझर्व्ह फंड ५०७ रुपयांचा आहे. सोसायटीकडे कायम ठेवींची रकम १७,८५० रुपये आहे. शेअर्समध्यें १२,२५० रुपये गुंतले असून सभासदांकडे ७,९११ रुपयांचीं कर्जें आहेत. अहवालाचे वर्षी सोसायटीस २०६ रुपयांचा नफा झाला. त्यांतून ९% दरानें डिव्हिडंडसाठी १२० रुपये वाटण्याचें ठरलें. वार्षिक सभा २१-९-४० रोजीं झाली.

---

### भुसावळ पीपल्स को. बँक लि. भुसावळ

वरील बँकेच्या ७५,००० रुपयांच्या अधिकृत भांडवलापैकीं ७४,८०० रुपयांचें भाग भांडवल अहवालाचे वर्ष अखेर वसूल झालेलें आहे. रिझर्व्ह फंडाची रकम २५,५२१ रुपये असून इतर फंड ३९,२२६ रुपयांचे आहेत. वर्षअखेर बँकेकडे ५,०८,३९९ रुपयांच्या ठेवी होत्या. सरकारी रोख्यांत गुंतविलेली ८४,९७९ रुपयांची मूळ किंमत म्हणून ताळेबंदांत दाखविली आहे. बँकेनें एकूण ३,०१,९०४ रुपयांचीं कर्जें, ओव्हरड्राफ्टस व कॅश क्रेडिट्स दिलीं आहेत. अहवालाचे वर्षी बँकेस ११,२७२ रुपयांचा नफा झाला. त्यांतून ४% दरानें डिव्हिडंड वाटण्यांत आलें. बँकेची वार्षिक सभा २८-९-४० रोजीं झाली.

---

### धुळे अर्बन को. क्रे. सो. लि.

वरील संस्थेचें वसूल झालेलें भाग भांडवल २,२९० रुपयांचें असून कायम ठेवी १५०० रुपयांच्या आहेत. बँक क्रेडिटची रकम १,३१३ रुपये आहे. बँकेकडे येणें कर्जाची रकम ५,१५८ रुपये आहे. अहवालाचे वर्षी संस्थेस १६९ रुपये नफा झाला. त्यांतून ५% प्रमाणें डिव्हिडंड वाटण्यांत यावा अशी बोर्डानें शिफारस केली. वार्षिक सभा १४-९-४० रोजीं झाली.

---


## आयुर्वेद रसशाळेची अभिनंदनीय प्रगति

पहिल्याच वर्षी

प्रेफरन्स शेअरवर ९ टक्के डिव्हिडंड देऊनही यंदा

★ ऑर्डिनरी शेअरवर ★

ऑर्डिनरी शेअर रु. २५ ] ९ टक्के [ प्रेफरन्स शेअर रु. १००

डिव्हिडंड जाहीर केलें आहे.

पैसे गुंतविण्यास उत्तम संधि

- पांच हजार रुपयांच्यावर ४ टक्क्यांनीं ठेवी स्वीकारणें आहेत.

प्रॉस्पेक्टससाठीं लिहा :

सेक्रेटरी

आयुर्वेद रसशाळा, पुणें लिमिटेड,

पुणें ४

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—६ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—९ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९१—४ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२—० |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९०—१४ |
| २½% १९४८–५२ ... ... ... | ९५–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०५—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१–६१) ... ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२१—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १३५—८ |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% ... ... | १०२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३८—८ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५३०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ३½% ... ... | ५३—० |
| ईस्टर्न बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | १२९—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १९७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१०—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १४०१—४ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १५६५—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | १००५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ७८०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २१६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४६—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १९—४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३९—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३६५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०६–१४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४३—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३४५—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. १ पै... | १७५२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १२१—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४१-१२-६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६२–१२–६ |

स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या
मूल्यमापनाचा निकाल.
हयातीनंतरचे विम्यावर रु. ५४ | त्रैवार्षिक दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर रु. ४५
आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन
कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स
कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.
• सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस
" जौहरे हुस्न " ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.
सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.
पत्ता:—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ ( A. P. ) अमृतसर–Amritsar.




एजंटः—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.

For Collegians
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
SHEVAK BROS.
Work-Shop Address: 153 Kasaba, Poona 2
Branch No. 1 Shevak Quarters, near Fergusson College Poona 4

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. दृ. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.